# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व कलावंत मेळावा.

## १४ जून २००५

## आणि

## यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल उद्‌घाटन समारंभ.

दि.१४ जून २००५ रोजी आपण सर्वांनीच पाहिलेल्या स्वप्नाची पूर्तता झाली. आपले 'नाट्यसंकुल 'पूर्ण झाले. केंद्रिय कृषि मंत्री, मा. श्री. शरदराव पवार, गानसम्राज्ञी श्रीमती लता मंगेशकर, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, मा. श्री. विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत नाट्यसंकुलाचा उद्‌घाटन सोहळा आणि १४ जूनचा पारितोषिक वितरण समारंभ आपल्या यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुलाच्या, 'यशवंत नाट्यमंदिरात,'संपन्न झाला. नाट्यसंकुल पूर्ण होण्यात मा. श्री. अशोकराव चव्हाण, मा.श्री. शशि प्रभू, मा. डॉ. रवि बापट यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाचा आणि सहकार्याचा मोठा वाटा आहे.

नाट्यसंकुलाच्या उद्‌घाटनच्यावेळी १४ जून पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. यावेळी अनेक मान्यवर कलावंतांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. या १४ जून पारितोषिक वितरण समारंभापासून नाट्य परिषदेतर्फे एक पुरुष आणि एक स्त्री अशा दोन रंगकर्मींसाठी दोन 'जीवनगौरव' पुरस्कार सुरु करण्यात आले. पहिल्या जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी म्हणून ज्येष्ठ अभिनेते श्री. मधुकर तोरडमल आणि ज्येष्ठ अभिनेत्री मा. श्रीमती आशालता यांना सन्मानित करण्यात आले.

## ८५ वे नाट्य संमेलन २००५ - कल्याण डोंबिवली (मागील अहवालात नमूद न करण्यात आलेला उर्वरीत तपशील)

दिनांक २९ व ३० जानेवारी २००५ रोजी कल्याण डोंबिवली येथे संपन्न झालेल्या ८५ व्या नाट्यसंमेलनात आचार्य अत्रे रंगमंदिर कल्याण येथे या दोनही दिवशी बालनाट्य, प्रायोगिक नाट्यप्रयोग आणि संगीत नाटकांच्या सादरीकरणांची रेलचेल होती. दि. २९ आणि ३० या दोन दिवसात रोह्याच्या 'स्पंदन' या संस्थेतर्फे 'शिवबा,' तसेच नाट्य परिषदेच्या पुणे उपनगरीय शाखेतर्फे 'जंगलबुक' आणि ॲक्टिव्ह ग्रुप सांगली, 'स्नेह' सातारा या संस्थांतर्फे बालनाट्ये तर तेजश्री अडिगे (चिंचवड) यांनी दिग्दर्शित केलेले महाराष्ट्र लोककला दर्शन आणि डोंबिवलीतील विकलांग मुलांनी सादर केलेला कार्यक्रम रसिकांची दाद घेऊन गेला.

बालरंगभूमीच्या भरगच्च कार्यक्रमाबरोबरच नाट्य परिषद बीड, शाखेतर्फे 'धुम्मस' ही एकांकिका, तर कल्याणच्या 'मिती चार' या संस्थेने 'दर्शन' हे म. टा. सन्मान प्राप्त प्रायोगिक नाटक सादर केले. त्याबरोबरच नाट्य परिषद जळगाव शाखेतर्फे 'ऑपरेशन दगड,' नागपूर शाखेतर्फे 'ते दोन दिवस' कल्याण डोंबिवली महानगर पालिकेतर्फे 'सारी रात्र' आणि डॉ. मीना नेरुरकर दिग्दर्शित आणि अमेरीका शाखा निर्मित एकांकिका असा प्रायोगिक नाटकांचा आस्वादही प्रेक्षकांना घेता आला.

या बरोबरच 'शांबरीक खरोलिक १८८५' हा बोलपटाच्या इतिहासावर आधारीत दृक श्राव्य कार्यक्रमही नाविण्यपूर्ण होता. याशिवाय नाट्य परिषद नांदेड शाखेने नाट्यगीते आणि संगीत नाट्यप्रवेश सादर केले आणि नाट्य परिषदेच्या कोल्हापूर शाखेने सादर केलेल्या 'संगीत स्वयंवर' या नाटकाने आचार्य अत्रे रंगमंदिरात सादर झालेल्या नाट्य संमेलनातील कार्यक्रमाची सांगता झाली.

दोन्ही दिवसातील संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन आणि संयोजन योगेश सोमण, प्रकाश यादव आणि अरविंद पारखी यांनी केले. त्यांना संजय धबडे आणि राजीव तायशेटे यांनी सहकार्य केले.